दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक
# वादळ वार्ता
vadalvartanews@gmail.com
संपादक : अजय भांगे
https://epaper.vadalvarta.com
बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | सोमवार दि.२५ मे २०२६ | 9422660077 | आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ | वर्ष ३ रे | अंक २६२ | पाने ४ | किंमत ४ रुपये
Beed (Mahmar) Daily Marathi | Monday 25 May 2026 | 9422660077 | RNI-MAHMAR / 2023 / 87555 | Year - 3rd | Issue 262 | Pages 4 | Rate 4 Rs

## पंकजा मुंडेंनी मानले फडणवीसांचे आभार

**मुंबई**–बीड जिल्ह्यातील पवित्र परळी वैजनाथ ज्योतिर्लिंग तीर्थक्षेत्राच्या विकासासाठी राज्य सरकारने मोठा निर्णय घेतला आहे. परळी वैजनाथ परिसराच्या सर्वांगीण विकासासाठी ३०१.५४ कोटी रुपयांच्या विकास आराखड्याला मंजुरी देण्यात आली आहे. या निर्णयामुळे परळी परिसराचा मोठ्या प्रमाणात कायापालट होणार असल्याची चर्चा सुरू झाली आहे. राज्याच्या ग्रामविकास मंत्री पंकजा मुंडे यांनी स्वतः सोशल मीडियावर पोस्ट करत ही माहिती दिली असून त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे विशेष आभार मानले आहेत.पंकजा मुंडे सध्या चारधाम यात्रेसाठी गेलेल्या होत्या. केदारनाथ दर्शनादरम्यान त्यांना परळी वैजनाथ विकास आराखड्याला मंजुरी मिळाल्याची माहिती मिळाली. या निर्णयानंतर त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेत त्यांना केदारनाथाचे प्रसाद आणि पुष्पगुच्छ देऊन कृतज्ञता व्यक्त केली. परळी वैजनाथ हे राज्यातील महत्त्वाचे ज्योतिर्लिंग तीर्थक्षेत्र असल्याने या विकास आराखड्यामुळे भाविकांना मोठा दिलासा मिळणार असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

# शिवसेना फुटल्याचे खापर माझ्यावर फोडू नका बच्चू कडू यांचा उद्धव ठाकरेंवर पलटवार

## कॅबिनेट मंत्रीपदावर फसवणूक केल्याचा आरोप



**सत्ताधारी शिवसेनेचे विधान परिषदेचे सदस्य बच्चू कडू यांनी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरेंवर जोरदार पलटवार केला आहे. उद्धव ठाकरे यांनी मला कॅबिनेट मंत्रिपदाचा शब्द दिला होता. पण प्रत्यक्षात माझ्याऐवजी शंकरराव गडाख यांना त्यांनी कॅबिनेट मंत्री केले. मला केवळ राज्यमंत्रीपदावर समाधान मानावे लागेल, असे ते अप्रत्यक्षपणे ठाकरेंवर फसवणुकीचा आरोप करताना म्हणालेत.**

**मुंबई । प्रतिनिधी**

बच्चू कडू यांच्या प्रहार संघटनेतील सोलापूर, परभणी व धाराशिव जिल्ह्यातील कार्यकर्त्यांनी शुक्रवारी उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वातील शिवसेनेत प्रवेश केला. यावेळी त्यांचे स्वागत करताना उद्धव ठाकरे यांनी शिंदे गटाच्या तिकिटावर विधान परिषदेवर जाणाऱ्या बच्चू कडू यांच्यावर निशाणा साधला. बच्चू कडूला घरी बोलावन मंत्री केले ही माझी चूक झाली. तो जुना शिवसैनिकच होता. पण लोभापायी गेला त्याला जाऊ द्या. कार्यकर्ते माझ्यासोबत आहेत याचा मला आनंद आहे, असे ते म्हणाले होते. त्यांच्या या टीकेला बच्चू कडू यांनी शुक्रवारी प्रत्युत्तर दिले.

बच्चू कडू म्हणाले, उद्धव ठाकरे यांनी आपल्याला कॅबिनेट मंत्रिपदाचा शब्द दिला होता. पण प्रत्यक्षात मला राज्यमंत्रीपद दिले. माझ्याऐवजी शंकरराव गडाख यांना त्यांनी कॅबिनेट मंत्रिपद दिले. एकनाथ शिंदेंनीच माझी उद्धव ठाकरे यांच्यासोबत भेट घालून दिली होती. मी उद्धव ठाकरे यांच्या घरी जाऊन त्यांना पाठिंबा दिला होता. आमच्या मतांमुळेच ते मुख्यमंत्री झाले. त्यांना स्वतः मुख्यमंत्री व्हायचे होते. त्यामुळे त्यांनी आहाल संख्याबळासाठी गळ घातली होती. ठाकरेंनी आम्हाला दिव्यांग मंत्रालय दिले नाही. त्यांनी माझ्याऐवजी गडाखांना ते दिले.उद्धव ठाकरे माझ्याविषयी जे काही बोलले ते मनापासून बोलले असे वाटत नाही. आम्ही तुम्हाला मुख्यमंत्री केले. मग आम्ही चूक केली असे म्हणणार का? मी गुवाहाटीला जातानाही उद्धव ठाकरे यांना विचारले होते. त्यामुळे त्यांनी शिवसेना फुटीचे खापर माझ्या डोक्यावर फोडू नये, असे बच्चू कडू म्हणाले.

# लग्नाचे आमिष दाखवून तरुणीवर अत्याचार पानवी खंडाळा येथील तरुणाविरुद्ध गुन्हा

## वैजापूर येथील लॉजवरील घटना; प्रेमसंबंधातून वाढवली जवळीक

दैनिक वादळ वार्ता

**वैजापूर । प्रतिनिधी**

वैजापूर येथे एका तरुणीला लग्नाचे आमिष दाखवून वारंवार अत्याचार केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या प्रकरणी नाशिक येथील २३ वर्षीय तरुणीच्या तक्रारीवरून गोकुळ शिवाजी बावचे (रा. पानवी खंडाळा, ता. वैजापूर) याच्याविरुद्ध वैजापूर पोलीस ठाण्यात बलात्कार व अ‍ॅट्रॉसिटी कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित तरुणी गेल्या दोन वर्षांपासून वैजापूर येथील एका फार्मसी महाविद्यालयात डी-फार्मसीचे शिक्षण घेत होती. शिक्षणासोबतच ती शहरातील एका खासगी रुग्णालयात पार्टटाईम नर्स म्हणूनही कार्यरत होती. याच दरम्यान उपचारासाठी आलेल्या गोकुळ बावचे याच्याशी तिची ओळख झाली. पुढे दोघांमध्ये संवाद वाढत गेला आणि त्याचे प्रेमसंबंधात




रूपांतर झाले.

तक्रारीनुसार, आरोपी गोकुळ बावचे हा तरुणीला वैजापूर शहरातील गंगापूर रोडवरील एका हॉटेलमध्ये वारंवार भेटण्यासाठी बोलवत होता. दोघांमधील जवळीक वाढल्यानंतर १० जुलै २०२५ रोजी आरोपीने तिला लाडगाव रोडवरून रोटेगाव येथील एका लॉजमध्ये नेले. तेथे लग्नाचे आश्वासन देत तिच्या इच्छेविरुद्ध प्रथमच शारीरिक संबंध प्रस्थापित केल्याचा आरोप आहे.

त्यानंतर जुलै २०२५ ते फेब्रुवारी २०२६ या कालावधीत आरोपीने वेगवेगळ्या वेळी विविध लॉजमध्ये नेऊन लग्नाचे आश्वासन देत वारंवार शारीरिक संबंध ठेवले. तरुणीने लग्नाबाबत विचारणा केल्यावर तो वेळ मारून नेत लवकरच लग्न करू असे सांगत होता. एप्रिल आणि मे २०२६ मध्येही आरोपीने लग्नाचे आमिष दाखवून तिच्यासोबत जबरदस्तीने संबंध ठेवल्याचा आरोप करण्यात आला आहे.

अखेर स्वतःची फसवणूक झाल्याची जाणीव झाल्यानंतर पीडित तरुणीने वैजापूर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्यानुसार वैजापूर पोलिसांनी गोकुळ शिवाजी बावचे याच्याविरुद्ध बलात्कार तसेच अ‍ॅट्रॉसिटी कायद्यान्वये गुन्हा दाखल केला असून, या प्रकरणाचा पुढील तपास उपविभागीय पोलिस अधिकारी भागवत फुंदे करीत आहेत.

# पिसाळलेल्या श्वानाने माळेगावात घातला धुमाकूळ,७ जणांना चावा,२ वृद्धा नांदेडला

## उपजिल्हा रुग्णालयात रेबीजचे इंजेक्शनच नाही, आरोग्य यंत्रणेवर संताप

दैनिक वादळ वार्ता

**देगलूर । प्रतिनिधी**

देगलूर तालुक्यात माळेगाव (मक्ता) येथे पिसाळलेल्या श्वानाने दोन दिवसांत गावभर हैदोस घालत सात नागरिक व अनेक मुक्या जनावरांना चावा घेतल्याने दहशतीचे वातावरण पसरले आहे. धक्कादायक म्हणजे, जखमींना घेऊन देगलूर उपजिल्हा रुग्णालयात पोहोचलेल्या नातेवाईकांना रेबीजचे इंजेक्शन व इम्युनोग्लोब्युलिनच उपलब्ध नाही असे सांगण्यात आले. त्यामुळे गंभीर जखमी संगाबाई अंगदराव मोतबा (७५) व कमलाबाई रघुराम डुमणे (५५) या दोन वृद्ध महिलांना जीव मुठीत धरून नांदेडला हलवावे लागले. गुरुवार दिनांक २१ ऑगस्ट रोजी सायंकाळी सुरू झालेला श्वानाचा हल्ला शुक्रवारी दिनांक २२ ऑगस्ट रोजी पहाटेपर्यंत सुरूच होता. पहाटे नैसर्गिक विधीसाठी बाहेर पडलेल्या नागरिकांवर त्याने झडप घातली. या हल्ल्यात संतोष घंटेवाड (२८), संगाबाई मोतबा (७५),



कमलाबाई डुमणे (५५), गजानन सोपान डोणगावे (२४) यांच्यासह तीन इतर जण जखमी झाले. अनेक गायी-वासरांनाही श्वानाने चावा घेतल्याने गावात साथीची भीती पसरली आहे. जखमींना तत्काळ देगलूर उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले.

**मात्र, श्वानदंशावर अत्यावश्यक असलेली अँटी रेबीज व्हॅक्सिन व इम्युनोग्लोब्युलिन इंजेक्शन उपलब्ध नसल्याचे सांगत डॉक्टरांनी हात वर केले. इंजेक्शनसाठी नांदेडला जा हा एकच उपाय नातेवाईकांना देण्यात आला. खासगी दवाखान्यात ३ ते ५ हजार रुपये खर्च परवडत नसल्याने गरीब रुग्ण हतबल झाले. तालुक्यात रोज श्वानदंशाच्या घटना घडतात. तरी उपजिल्हा रुग्णालयात रेबीजची लस नसणे म्हणजे अक्षम्य गुन्हा आहे. कर्मचाऱ्यांकडून उडवाउडवीची उत्तरे मिळतात. एका वृद्ध महिलेचा जीव गेला तर जबाबदार कोण? असा संतप्त सवाल सरपंच शिवराज पाटील माळेगावकर यांनी उपस्थित केला. दोन दिवस गावात धुमाकूळ घालणारा पिसाळलेला श्वानला पकडण्यात ग्रामपंचायत व पशुवैद्यकीय विभाग पूर्णपणे अपयशी ठरला आहे. त्यामुळे आणखी बळी जाण्याची भीती ग्रामस्थ व्यक्त करत आहेत.**

# आ.मुनगंटीवार यांचा चंद्रपूरच्या मातीतून ऑलिम्पिक पदकवीर घडविण्याचा निर्धार

## धनवान नव्हे, गुणवान व्हा; आ.मुनगंटीवार यांचा विद्यार्थ्यांना दिला यशाचा मंत्र

दैनिक वादळ वार्ता

**बल्लारपूर । प्रतिनिधी**

चंद्रपूर जिल्ह्यातील विद्यार्थ्यांनी केवळ शिक्षणातच नव्हे, तर क्रीडा, संस्कार आणि गुणवत्तेच्या बळावर जागतिक स्तरावर आपला ठसा उमटवावा आणि २०३६ च्या ऑलिम्पिक स्पर्धेत चंद्रपूर जिल्ह्याच्या मातीतून ऑलिम्पिक पदकवीर घडावेत, असा निर्धार राज्याचे माजी वने व सांस्कृतिक कार्य मंत्री आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी व्यक्त केला. स्व. डॉ. सच्चिदानंद मुनगंटीवार यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ बल्लारपूर येथे आयोजित समर कॅम्पच्या समारोप सोहळ्यात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना त्यांनी हा संकल्प व्यक्त केला.

यावेळी बोलताना आमदार सुधीर मुनगंटीवार म्हणाले, श्रीकांत आंबेकर व त्यांच्या संपूर्ण टीमने समाजसेवा आणि विद्यार्थ्यांच्या जडणघडणीचा एक आदर्श उपक्रम उभा केला आहे. सेवाभाव आणि ध्येयवेड्या वृत्तीच्या जोरावर शहरातील गरजूंची सेवा करत विद्यार्थ्यांना गुणवंत घडविण्याचे महत्त्वपूर्ण कार्य ते करीत असल्याचे आ.मुनगंटीवार यांनी नमूद केले.विविध क्रीडा स्पर्धांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचे मैदानाशी नाते जोडण्याचे महत्त्वपूर्ण कार्य या समर कॅम्पने केल्याचे सांगत, देश प्रगतीपथावर न्यायचा असेल तर देशातील प्रत्येक विद्यार्थ्याचे पाऊल पुढे पडले पाहिजे, असे ते म्हणाले.

महान संशोधक थॉमस एल्वा एडिसन यांच्या जीवनातील संघर्षाचे उदाहरण देत त्यांनी विद्यार्थ्यांना प्रेरणा दिली. कष्ट, मेहनत आणि जिद्दीच्या बळावर कोणतीही प्रतिकूल परिस्थिती जिंकता येते, असा संदेश आ.मुनगंटीवार यांनी दिला.धनवान होण्यापेक्षा गुणवान व्हा, हा जीवनमंत्र विद्यार्थ्यांना देत त्यांनी संस्कार, गुणवत्ता आणि मेहनतीचे महत्त्व अधोरेखित



केले.

मिशन ऑलिम्पिकच्या माध्यमातून चंद्रपूर जिल्ह्यात अत्याधुनिक क्रीडा सुविधा निर्माण करण्याचे काम सुरू असल्याची माहिती त्यांनी दिली. बल्लारपूर, मुल, पोंभूर्णा आणि चंद्रपूर येथे स्टेडियम उभारण्यात आले असून सैनिक शाळेतील स्टेडियम अत्याधुनिक सुविधांनी सुसज्ज असल्याचे आ.मुनगंटीवार यांनी सांगितले. तसेच जिल्हा परिषदेच्या सहा शाळा दत्तक घेऊन त्या ठिकाणीही उत्कृष्ट दर्जाच्या छोट्या स्टेडियमची निर्मिती करण्यात येणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.


यावेळी भारतरत्न महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संघर्षमय जीवनाचा उल्लेख करत शिक्षण आणि वाचन संस्कृतीचे महत्त्व त्यांनी अधोरेखित केले. गरीब विद्यार्थ्यांना ज्ञानाची संधी उपलब्ध व्हावी यासाठी बल्लारपूर, मुल, चंद्रपूर आणि पोंभूर्णा येथे वाचनालयांची निर्मिती करण्यात आली असून मंत्रीपदाच्या कार्यकाळात जिल्ह्यात २० ग्रंथालयांची कामे सुरू करण्यात आल्याची माहिती त्यांनी दिली.

तुम्ही किती शिक्षण घेतले किंवा किती धनवान झालात, यावर माणसाचे खरे यश मोजले जात नाही. आई-वडील अभिमानाने 'हा माझा मुलगा, ही माझी मुलगी आहे' असे म्हणतील, यापेक्षा मोठे यश दुसरे नाही, असे सांगत विद्यार्थ्यांनी आयुष्यात संस्कार, कर्तृत्व आणि माणुसकीची शिदोरी सोबत ठेवावी, असा संदेश आ. मुनगंटीवार यांनी दिला. यासोबतच सर्व विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी त्यांनी मनःपूर्वक शुभेच्छाही व्यक्त केल्या.

# संपादकीय

## झुरळांची आभासी एकजूट




समाजमाध्यमांवर सक्रिय राहून व्यवस्थेवर टीकाटिप्पणी करणाऱ्या बेरोजगार तरुणांचा, सरन्यायाधीश सूर्य कांत यांनी ‘झुरळ’ असा उल्लेख केल्यानंतर या झुरळांच्याच नावाने पक्ष स्थापन करून चार दिवसांतच देशातील सर्वाधिक ऑनलाइन पाठीराखे मिळविण्याची घटना आपल्याकडील युवकांतील अस्वस्थता अधोरेखित करणारी आहे, यात शंका नाही.ऑनलाइन जगतात ‘ कॉक्रोच जनता पार्टी ’च्या (सीजेपी) झेंड्याखाली अल्पावधीत सुमारे दोन कोटी लोकांचे एकवटणे ही आजच्या माहिती तंत्रज्ञानावरील अवलंबित्व वाढलेल्या काळातील एक महत्त्वाची घटना. समाजात प्रस्थापितांच्या विरोधात राग असतो; तो व्यक्त करण्यासाठी समाजमाध्यमे उपलब्ध असली, तरी त्याची तीव्रता वाढण्यासाठी आणि तो सत्ताधाऱ्यांपर्यंत पोहोचण्यासाठी चळवळीचीही गरज असते. झुरळांच्या नावाने सुरू झालेला पक्ष अशी चळवळ उभा करू शकतो काय, हे पाहावे लागेल.तमिळनाडू विधानसभा निवडणुकीत अभिनेते विजय यांच्या पक्षाने समाजमाध्यमांचा मोठ्या प्रमाणावर उपयोग करून घेतला हे खरे; परंतु त्याच्या जोडीने रस्त्यावर उतरून आखणीही केली. रोजगार, महागाई यांसारख्या प्रश्नांना भिडणाऱ्यांच्या आणि रोज उपेक्षेला सामोरे जाणाऱ्यांच्या मनात असलेल्या तीव्र संतापाचे परिवर्तनात रूपांतर करण्यासाठी पक्ष स्थापून आणि त्याला कोट्यवधी ऑनलाइन पाठीराखे मिळवून ‘सीजेपी’ने जोरकस पाऊल उचलले. आता याच पाठीराख्यांच्या मदतीने जमिनीवरून काम करावे लागेल आणि त्याचे आव्हान मोठे आहे.आजच्या काळात ‘नॅरेटिव्ह’ म्हणजेच कथनाला विशेष महत्त्व आहे. समाजमाध्यमाद्वारे आपले कथन जोरकसपणे मन–मेंदूपर्यंत पोहोचविता येते. राजकारणाचा हा ऑनलाइन ते ऑफलाइन प्रवास नवा नाही. ‘सीजेपी’ला तो आता करावा लागेल. मूळच्या छत्रपती संभाजीनगरातील आणि सध्या अमेरिकेत वास्तव्यास असलेल्या अभिजीत दीपके या युवकाने, सरन्यायाधीशांच्या वक्तव्यानंतर आपले ‘कथन’ मांडले. ‘बेरोजगार, आळशी, ऑनलाइन पडीक आणि सराईतपणे रडगाणे गाणारे’ या सर्वांना त्याने आवाहन केले. त्यात उपहास असला, तरी तो विदारक होता. त्याच्या आवाहनाला मोठा प्रतिसाद मिळाला.आपल्याला एखाद्या य:कश्चित झुरळासमान मानावे याचा रागही या प्रतिसादात आहे. बेरोजगार तरुणांमधील खदखद किती खोलवर आहे, हे यातून दिसते. मोठ्या घटनांनंतर त्यांची खिल्ली उडविणारे ‘मीम्स’ समाजमाध्यमांवर येत असतात; नवा विषय आला, की आधीचा विषय मागे पडतो. झुरळाच्या नावे पक्षस्थापनेची घटना, तिला मिळालेला प्रतिसाद आणि दीपके यांची विधाने पाहता हा विषय मागे पडणारा नाही; तसेच तो बेदखल करण्याजोगाही नाही.मात्र, समाजमाध्यमांवरील पाठीराख्यांची संख्या हा निकष असू शकतो काय? याचे उत्तर हे कथित पाठीराखे कुणाचे यावर बेतलेले असते. स्वत:ला ‘झुरळ’ म्हणवून घेत पुढाकार घेणारा दीपके सध्या तरी भारतात राहत नाही. सारी सूत्रे तो अमेरिकेत राहून हलवितो आहे. या पक्षाबाबत तो किती गंभीर आहे, हे त्याच्या पुढील कृतींवरून कळेल. ‘सीजेपी’च्या पाठीराख्यांत असे परदेशातील अनेक जण असू शकतात; काही बनावटही असू शकतात. मात्र, त्यांच्या वाढत्या संख्येची येथील प्रस्थापितांना दखल घ्यावी लागली. अनेक तक्रारीअंती ‘सीजेपी’चे ‘एक्स’ खाते स्थगित करण्यात आले. ते हॅक करण्याचेही प्रयत्न झाले. दीपकेला जीवे मारण्याच्या धमक्या मिळाल्या.‘सीजेपी’चे पाठीराखे खोटे असल्याचे किंवा त्यामागे अन्य कोणाचे कारस्थान असल्याचे दावे केले गेले. देशभक्तीच्या औषधाने अशी ‘झुरळे’ मारण्याची भाषाही केली गेली. सत्ताधारी भाजपने अधिकृत प्रतिक्रियाही दिली. ‘झुरळां’च्या एकजुटीकडे पाहिले जात आहे, हाच याचा अर्थ. ‘सीजेपी’च्या निमित्ताने तरुणाईला मते मांडण्यासाठी, आपल्या कल्पनेतील आदर्श व्यवस्था सांगण्यासाठी आणि देश घडविण्यासाठी एक पक्ष मिळाला आहे. लोकशाहीमध्ये तरुणांना आकर्षित करणारे असे पक्ष उदयाला येऊन व्यवस्थेचा भागही बनतात. राज्यघटनेच्या चौकटीत राहून, अराजकतेला आमंत्रण न देता सामान्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी राजकीय पक्षाच्या रूपाने पुढे येणाऱ्या सर्वांचेच स्वागत करायला हवे. झुरळांच्या नावे सुरू झालेला पक्षही याला अपवाद नाही.

# नवनिर्वाचित अध्यक्ष रामचंद्र दळवी साहेब यांचे नवी मुंबई जिल्हा काँग्रेस कमिटीतर्फे नियुक्तीपर शेकडो कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत शुभेच्छांचा वर्षाव

दैनिक वादळ वार्ता

**मुंबई | प्रतिनिधी**

नवी मुंबई जिल्हा काँग्रेस कमिटीच्या नवनिर्वाचित अध्यक्षपदी *रामचंद्र दळवी साहेब यांची निवड झाल्यानंतर स्थानिक पक्ष संघटनेत नवचैतन्य निर्माण झाले आहे. या नियुक्तीचे स्वागत करण्यासाठी नवी मुंबई काँग्रेसच्या वाशी मुख्य कार्यालयात एका सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी अनेक पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी एकत्र येत नवनिर्वाचित अध्यक्ष रामचंद्र दळवी साहेब यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले आणि त्यांना पुढील राजकीय वाटचालीसाठी भरभरून शुभेच्छा दिल्या.

**कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण**

रामचंद्र दळवी साहेब यांच्यासारख्या अनुभवी आणि जनसामान्यांशी नाळ जोडलेल्या नेत्याची जिल्हाध्यक्षपदी नियुक्ती झाल्याची बातमी धडकताच कार्यकर्त्यांमध्ये मोठा उत्साह पाहायला मिळाला. मुख्य कार्यालयात आयोजित करण्यात आलेल्या या सत्कार सोहळ्याला खालील मान्यवर आणि कार्यकर्त्यांची मोठी उपस्थिती होती:

**पक्षाचे ज्येष्ठ नेते आणि मार्गदर्शक**



**नवी मुंबई काँग्रेस कमिटीचे आजी–माजी पदाधिकारी**

**महिला आघाडी आणि युवक काँग्रेसचे कार्यकर्ते**

**तळागाळातील शेकडो निष्ठावान कार्यकर्ते**

पुष्पहार आणि पुष्पगुच्छ देऊन दळवी यांचे भव्य स्वागत करण्यात आले. यावेळी कार्यकर्त्यांनी दिलेल्या घोषणांनी संपूर्ण परिसर दणाणून गेला होता.

**पक्षाला नवी दिशा मिळण्याची आशा**

यावेळी बोलताना संतोष सुतार उपाध्यक्ष नवी मुंबई काँग्रेस यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. रामचंद्र दळवी यांच्या प्रदीर्घ अनुभवाचा आणि संघटन कौशल्याचा नवी मुंबईत काँग्रेस पक्ष वाढीसाठी मोठा फायदा होईल. त्यांच्या नेतृत्वाखाली सर्व ताण तणाव विसरून पक्ष एकसंधपणे काम करेल, असा विश्वास उपस्थित त्यांनी व्यक्त केला.

**नवनिर्वाचित अध्यक्षांचे मनोगत**

शेकडो कार्यकर्त्यांच्या या उदंड प्रतिसादाने आणि प्रेमाने भारावून गेलेल्या *रामचंद्र दळवी* यांनी सर्वांचे आभार मानले. उपस्थितांना मार्गदर्शन करताना ते म्हणाले:काँग्रेस पक्षश्रेष्ठींनी आणि तुम्हा सर्व कार्यकर्त्यांनी माझ्यावर जो मोठा विश्वास टाकला आहे, तो मी नक्कीच सार्थ ठरवेन. आपण सर्वांनी मिळून नवी मुंबईत काँग्रेस पक्षाला पुन्हा एकदा गतवैभव प्राप्त करून द्यायचे आहे. सर्वसामान्य जनतेचे प्रश्न सोडवण्यासाठी आणि पक्ष संघटना मजबूत करण्यासाठी आपण खांद्याला खांदा लावून काम करूया.

**पुढील वाटचाल**

आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर नवी मुंबई काँग्रेसची धुरा रामचंद्र दळवी यांच्यासारख्या सक्षम नेत्याच्या हाती आल्याने कार्यकर्त्यांचे मनोबल उंचावले आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली नवी मुंबईमध्ये काँग्रेस पक्ष अधिक आक्रमकपणे जनतेचे प्रश्न मांडेल आणि संघटनात्मक पातळीवर मोठे बदल पाहायला मिळतील, अशी चर्चा राजकीय वर्तुळात रंगू लागली आहे. या दिमाखदार सोहळ्याची सांगता उपस्थितांच्या आभार प्रदर्शनाने आणि चहापान कार्यक्रमने झाली.

# ग्राहकांचा विश्वास हेच आमचे बळ आहे, नवी मुंबई परिसरातील सर्व सामान्याचे स्वप्न साकार करणार–संदीप कदम

दैनिक वादळ वार्ता

**मुंबई | प्रतिनिधी**

नवी मुंबई परिसरात सेजल एंटरप्रायझेस – ए.एस. कन्स्ट्रक्शन बिल्डर अँड डेव्हलपर या विकासकांनी सामान्य आणि मध्यमवर्गीयांचे हक्काचे आकर्षक घर मिळवण्याचे स्वप्न साकार केले आहे. सर्वसामान्य कुटुंबांना परवडणाऱ्या दरात दर्जेदार घरे उपलब्ध करून देणे हा कंपनीचा मुख्य उद्देश आहे. आपले हक्काचे घर असावे असे प्रत्येकाचे स्वप्न असते. पण ते साकार होताना अनेकांचे आयुष्य गेले.मात्र तरीही स्वतःचे हक्काचे घर घेता येत नाही. नवी मुंबई परिसरात स्वतःचे घर असावे हा एकच उद्देश घेऊन सेजल एंटरप्रायझेस – ए.एस. कन्स्ट्रक्शन बिल्डर अँड डेव्हलपर घरांचा प्रकल्प घेऊन आले आहेत. त्यांमध्ये १ RK, १ BHK आणि २ BHK फ्लॅट्स उपलब्ध असून ग्राहकांना घर खरेदीसाठी विशेष आर्थिक सुविधा म्हणजे कमी डाऊन पेमेंट मध्ये घर उपलब्ध करून देण्यात येत आहेत. त्यामध्ये फक्त २०% डाउन पेमेंट (DP) भरून उर्वरित ८०% बँक कर्ज (Loan) सुविधेचा लाभ घेता येणार आहे.त्याचप्रमाणे प्रधानमंत्री आवास योजना (PMAY) अंतर्गत पात्र ग्राहकांना शासकीय लाभ मिळवून देण्यासाठी मार्गदर्शन व सहाय्य देखील करण्यात येत आहे. आधुनिक सुविधा, उत्कृष्ट बांधकाम गुणवत्ता आणि विश्वासार्ह सेवा यामुळे सेजल एंटरप्रायझेस नागरिकांच्या पसंतीस उतरत असल्याने घर खरेदीसाठी गर्दी केली आहे.याबाबत बोलताना श्री. संदीप कदम यांनी सांगितले की, प्रत्येक कुटुंबाला स्वतःचे हक्काचे घर मिळावे, या उद्देशाने आम्ही परवडणाऱ्या दरात दर्जेदार घरे उपलब्ध करून देत आहोत. ग्राहकांचा विश्वास हेच आमचे बळ आहे. विश्वास, गुणवत्ता आणि वेळेची हमी आपल्या घराचे स्वप्न साकार करण्यासाठी सेजल एंटरप्रायझेस ए.एस. कन्स्ट्रक्शन बिल्डर अँड डेव्हलपर , दुकान क्र. १, एकवीरा अपार्टमेंट, प्लॉट क्र. २९, रिलायन्स गेस्ट हाऊस जवळ, तळवली गाव. आवश्यक भेट द्या आणि आपले हक्काचे घर मिळवा असे आवाहन या कंपनीचे विकासक श्री. संदीप सिताराम कदम यांनी केले आहे



# विधानपरिषदेच्या उमेदवारीसाठी हाबाडा फेम रमेश आडसकर याचे नाव चर्चेत

## बीड–लातूर–धाराशिव मतदारसंघात संधी दिल्यास पक्षाला होणार फायदा

दैनिक वादळ वार्ता

**बीड | प्रतिनिधी**

बीड –लातूर–धाराशिव स्थानिक प्राधिकरण विधान परिषद मतदारसंघाच्या निवडणुकीची रणधुमाळी सुरू झाली असून, राष्ट्रवादी काँग्रेसकडून संभाव्य उमेदवार म्हणून आंबा सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन तसेच शिक्षण क्षेत्रातील अभ्यासू आणि जनसामान्यांमध्ये मजबूत संपर्क असलेले रमेश आडसकर यांचे नाव सध्या जोरदार चर्चेत आहे. पक्षनिष्ठा, संघटन कौशल्य, तिन्ही जिल्ह्यांतील मजबूत जनसंपर्क आणि सर्वपक्षीय स्नेहसंबंध या बळावर रमेश आडसकर यांना यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसकडून विधान परिषदेची उमेदवारी द्यावी, अशी मागणी कार्यकर्ते आणि सर्वसामान्य नागरिकांकडून होत आहे.स्व. अजितदादा पवार यांचे विश्वासू सहकारी म्हणून ओळख असलेल्या रमेश आडसकर यांनी गेली तीन दशके जिल्हा परिषद राजकारणापासून सहकार आणि शिक्षण क्षेत्रापर्यंत सातत्याने काम करत स्वतःची स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. स्व. लोकनेते बाबुरावजी आडसकर यांच्यामार्गदर्शनाखाली आणि बंधू मेघराज आडसकर यांच्या सहकार्याने त्यांनी सामाजिक व राजकीय क्षेत्रात भक्कम पायाभरणी केली. रमेश आडसकर यांची सर्वात मोठी जमेची बाजू म्हणजे लोकांशी असलेला थेट संवाद. कोणतेही मोठे पद नसतानाही सामान्य नागरिकांची कामे पूर्णत्वास नेण्याची त्यांची कार्यशैली आजही ग्रामीण भागात चर्चेचा विषय ठरते. माजलगाव, केज, परळीसह बीड जिल्ह्यातील अनेक भागांमध्ये त्यांचा प्रभाव असून, धाराशिव जिल्ह्यातील कळंब तालुक्यापर्यंत त्यांनी शैक्षणिक कार्याचा विस्तार केला आहे.बदलत्या शैक्षणिक पद्धतीनुसार ग्रामीण विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण मिळावे या उद्देशाने त्यांनी सीबीएसई पॅटर्नच्या इंग्रजी माध्यमाच्या शाळा सुरू करत शिक्षण क्षेत्रात मोठे योगदान दिले आहे. मागील विधान परिषद निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसला अपेक्षित यश मिळाले नव्हते. त्या निवडणुकीत महायुतीच्या पाठबळावर भाजपचे सुरेश धस यांनी विजय मिळवत राष्ट्रवादीच्या पारंपरिक मानल्या जाणाऱ्या जागेवर कब्जा केला होता. त्यामुळे यंदाची निवडणूक राष्ट्रवादी काँग्रेससाठी प्रतिष्ठेची मानली जात आहे. विशेषतः स्वर्गीय अजितदादा पवार यांनी या मतदारसंघात राष्ट्रवादीचा आमदार असावा, अशी भूमिका घेतली होती. मात्र ते स्वप्न अपूर्ण राहिले. आता तेच स्वप्न पूर्णत्वास नेण्यासाठी सक्षम आणि सर्वमान्य चेहरा म्हणून रमेश आडसकर यांच्याकडे पाहिले जात आहे. राजकीय विश्लेषकांच्या मते, बीड–लातूर धाराशिव या तिन्ही जिल्ह्यांतील स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महायुतीचे संख्याबळ प्रभावी आहे. राष्ट्रवादी काँग्रेस, भाजप आणि शिवसेना शिंदे गट यांच्यात समन्वय साधला गेला, तर रमेश आडसकर यांच्या विजयाचा मार्ग अधिक सुकर होऊ शकतो. विशेष म्हणजे, उपमुख्यमंत्री तसेच राष्ट्रवादी काँग्रेसच्या राष्ट्रीय अध्यक्षा सुनेत्राताई पवार या मराठवाड्याशी भावनिक नाळ जुळलेल्या नेत्या म्हणून पाहिल्या जातात. त्यामुळे त्यांनी मराठवाड्यातील पक्षसंघटना अधिक मजबूत करण्यासाठी आडसकरांसारख्या जमिनीवर काम करणाऱ्या नेतृत्वाला संधी द्यावी, अशी भावना कार्यकर्त्यांमध्ये व्यक्त होत आहे. केज मतदारसंघ हा आडसकर कुटुंबीयांचा प्रभाव असलेला भाग मानला जातो.तसेच परळी, माजलगाव आणि गेवराई या भागांमध्येही त्यांचे मजबूत संपर्क आहेत. रमेश आडसकर यांचे पुतणे तसेच आंबा सहकारी साखर कारखान्याचे संचालक ऋषिकेश आडसकर यांनीही मागील काही वर्षांत युवकांमध्ये मोठा जनसंपर्क निर्माण केला आहे. त्यामुळे आडसकर कुटुंबाचा वाढता सामाजिक आणि राजकीय प्रभाव या निवडणुकीत निर्णायक ठरू शकतो, असे जाणकारांचे मत आहे. एकंदरीत, बीड–लातूर–धाराशिव या तिन्ही जिल्ह्यांतील राजकीय, सामाजिक आणि संघटनात्मक समीकरणांचा विचार करता रमेश आडसकर यांना विधान परिषदेची उमेदवारी दिल्यास राष्ट्रवादी काँग्रेसला नवसंजीवनी मिळू शकते, अशी चर्चा सध्या राजकीय वर्तुळात रंगत आहे. आता सुनेत्राताई पवार यांचा निर्णय काय होणार, याकडे तिन्ही जिल्ह्यांचे लक्ष लागले आहे.



# पर्यटकांच्या सुरक्षेसाठी नागाव ग्राम पंचायतीचा हायटेक प्रयोग यशस्वी

## बुडणाऱ्यांसाठी काही सेकंदांत मदतीला धावणारे आधुनिक जीवरक्षक तंत्रज्ञान

दैनिक वादळ वार्ता

**मुंबई | प्रतिनिधी**

नागाव बीचवरील पर्यटकांच्या सुरक्षिततेसाठी आता अत्याधुनिक तंत्रज्ञानाची साथ मिळाली असून रोबोटिक बोयो हे आधुनिक जीवरक्षक उपकरण प्रत्यक्ष बचावकार्यात प्रभावी ठरत असल्याचे आज झालेल्या प्रात्यक्षिकातून स्पष्ट झाले. पाण्यात अडकलेल्या किंवा बुडणाऱ्या व्यक्तींपर्यंत काही क्षणांत पोहोचून मदत करणाऱ्या या यंत्रणेमुळे नागाव बीचवरील सुरक्षा व्यवस्थेला नवे बळ मिळाले आहे.या विशेष प्रात्यक्षिकाला कोकण विभागीय आयुक्त मा. श्रीमती रुबल अग्रवाल यांनी उपस्थित राहून यंत्रणेची कार्यपद्धती जाणून घेतली. पर्यटकांच्या सुरक्षेसाठी ‘रोबोटिक बोयो’ हे खऱ्या अर्थाने जीवनरक्षक तंत्रज्ञान आहे, असे सांगत त्यांनी या अभिनव उपक्रमाचे कौतुक केले.



यावेळी नागावचे माजी सरपंच नंदकुमार मयेकर, जिल्हा परिषद सदस्य डॉ. सचिन राऊळ, जिल्हाधिकारी किशन जावळे, मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, निवासी उपजिल्हाधिकारी संदेश शिर्के, उपजिल्हाधिकारी डॉ. रवींद्र शेळके, तहसिलदार विक्रम पाटील, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी सागर पाठक तसेच जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा परिषद, ग्रामपंचायत प्रशासनातील अधिकारी–कर्मचारी उपस्थित होते.

भेटीदरम्यान विभागीय आयुक्तांनी नागाव बीचवरील पर्यटकांसाठी उपलब्ध सुविधा अधिक सक्षम करण्याच्या दृष्टीने विविध सूचना दिल्या. विशेषतः सार्वजनिक शौचालयांची संख्या वाढविणे, पर्यटकांची माहिती नोंदविण्यासाठी प्रभावी प्रणाली उभारणे तसेच बीच परिसरातील सुविधा अधिक आधुनिक करण्यावर भर देण्यात आला.सरपंच सौ. हर्षदा मयेकर यांच्या नेतृत्वाखाली नागाव ग्रामपंचायतने पर्यटन विकास आणि सुरक्षिततेच्या दृष्टीने अनेक नाविन्यपूर्ण उपक्रम राबवले आहेत. बीच सुरक्षा, स्वच्छता, पर्यावरण संवर्धन आणि आधुनिक सुविधा यांचा समतोल राखत नागावला आदर्श पर्यटनस्थळ बनविण्याचे प्रयत्न सातत्याने सुरू आहेत.

रोबोटिक बोयोसारख्या अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर हा नागावच्या पर्यटन विकासातील महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे. प्रशासन आणि ग्रामपंचायत यांच्या समन्वयातून नागाव बीच भविष्यात राज्यातील सर्वात सुरक्षित, सुसज्ज आणि आकर्षक पर्यटनस्थळांपैकी एक म्हणून ओळख निर्माण करेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

# शिवभक्तीच्या महासागरात करमाळा नगरी दंग सात दिवसीय शिवमहापुराण कथेची भक्तिमय सांगता

दैनिक वादळ वार्ता
**सोलापूर । प्रतिनिधी**

अधिक मासानिमित्त करमाळा येथील संत गजानन महाराज मंदिर परिसरात आयोजित करण्यात आलेल्या भव्य शिवमहापुराण कथेची गुरुवारी अत्यंत भक्तिमय वातावरणात सांगता झाली. सात दिवस चाललेल्या या धार्मिक महोत्सवाने संपूर्ण करमाळा नगरी अक्षरशः शिवमय झाली होती. हर हर महादेव च्या जयघोषाने मंदिर परिसर दुमदुमून गेला असून हजारो शिवभक्तांच्या उपस्थितीने कार्यक्रमाला अभूतपूर्व प्रतिसाद मिळाला. १५ मे ते २१ मे दरम्यान पार पडलेल्या या शिवमहापुराण कथेचे निरूपण ह.भ.प. स्नेहगंगाश्री आळंदीकर माई यांनी आपल्या प्रभावी आणि ओजस्वी वाणीतून केले. भगवान शिवशंकरांच्या भक्तीचे महत्त्व, बारा ज्योतिर्लिंगांचे आध्यात्मिक सामर्थ्य तसेच अर्धनारीनटेश्वर रूपातील शिवशक्तीचे तत्त्वज्ञान त्यांनी अत्यंत भावपूर्ण शैलीत उलगडून सांगितले. बारा ज्योतिर्लिंगांच्या केवळ स्मरणानेही पापांचा नाश होतो. शिवभक्ती ही मानवाच्या जीवनाला समाधान, शांती आणि कल्याण देणारी दिव्य शक्ती आहे,असे प्रतिपादन त्यांनी केले. त्यांच्या ओघवत्या निरूपणाने उपस्थित भाविक अक्षरशः मंत्रमुग्ध झाले.

कथेदरम्यान भगवान शिवशंकर आणि देवीच्या अर्धनारीनटेश्वर रूपाचा आकर्षक सजीव देखावा सादर करण्यात आला. संत गजानन महाराजांच्या आराध्य दिनानिमित्त उभारण्यात आलेल्या भव्य देखाव्यांनी भाविकांचे विशेष लक्ष वेधून घेतले. गण गण गणात बोते च्या जयघोषात भाविक भक्तिभावाने नतमस्तक झाले.महिला भगिनींनी देवीसमोर पारंपरिक फुगड्या घालत आरती केली. तुळजाभवानी माता की जय, जगदंबे की जय, सप्तशृंगी माते की जय अशा जयघोषांनी संपूर्ण परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला होता.




कार्यक्रमाच्या सांगता सोहळ्यास तहसीलदार शिल्पा ठोकडे, पोलीस निरीक्षक रणजीत माने, जामखेडच्या नगराध्यक्षा प्रांजल चिंतामणी, नगरसेवक अमित चिंतामणी, शिवसेना जिल्हाप्रमुख महेश चिवटे, दत्तकला शिक्षण संस्थेचे अध्यक्ष प्रा. रामदास झोळ, नगरसेवक सचिन गायकवाड, जामखेडचे शिवसेना नेते आकाश बाफना यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवरांची प्रमुख उपस्थिती लाभली.

उपस्थित मान्यवरांनी आयोजनाचे कौतुक करत आयोजकांना शुभेच्छा दिल्या. यावेळी महाप्रसादाचे मोठ्या प्रमाणावर वाटप करण्यात आले. स्वर्गीय डॉ. प्रदीपकुमार जाधव पाटील यांच्या स्मरणार्थ डॉ. रोहन पाटील यांनी परिवाराच्या वतीने अन्नदान केले. करमाळा शहर व तालुक्यातील हजारो भक्तांनी महाप्रसादाचा लाभ घेतला.

मुख्य यजमान श्रेणिकशेठ खाटेर, सौ. संगीता खाटेर, ॲड. संकेत खाटेर, मोक्षा खाटेर व वर्धमान खाटेर यांनी परिवारासह महाआरती व ग्रंथपूजन करून कार्यक्रमाची सांगता केली.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी श्रीमद् भागवत कथा ज्ञानयज्ञ समिती, संत गजानन महाराज मंदिर समिती, भक्त परिवार तसेच एसटी कॉलनी महिला मंडळ यांनी विशेष परिश्रम घेतले. याशिवाय विविध क्षेत्रातील नागरिकांनीही मोलाचे सहकार्य केले.

या सात दिवसीय शिवमहापुराण कथेच्या निमित्ताने करमाळा शहरातील धार्मिक व सांस्कृतिक वातावरण अधिक दृढ झाल्याची भावना भाविकांनी व्यक्त केली. भव्य-दिव्य स्वरूपात पार पडलेल्या या आयोजनाबद्दल सर्व स्तरांतून आयोजकांचे कौतुक होत आहे.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन ज्योती मुथ्था यांनी केले, तर आभार प्रदर्शन मुख्य यजमान श्रेणिकशेठ खाटेर यांनी मानले.

# उपविभागीय अधिकाऱ्यांच्या मध्यस्थीने चिखलीतील उपोषण मागे

## आचारसंहितेनंतर रस्त्याच्या डांबरीकरणाचे आश्वासन

दैनिक वादळ वार्ता
**चिमूर । प्रतिनिधी**

चिखली ते भिवापूर रस्त्याच्या दुरुस्ती व डांबरीकरणाच्या मागणीसाठी चिखली येथे सुरू असलेले बेमुदत उपोषण अखेर उपविभागीय अधिकारी विद्यासागर चव्हाण यांच्या मध्यस्थीने गुरुवारी मागे घेण्यात आले. प्रशासनाकडून रस्त्याचे काम लवकर सुरू करण्याचे आश्वासन देण्यात आल्यानंतर आंदोलनकर्त्यांनी उपोषण समाप्त करण्याचा निर्णय घेतला.चिमूर आणि भिवापूर या दोन्ही तालुक्यांना जोडणारा महत्त्वाचा चिखली-भिवापूर मार्ग गेल्या अनेक दिवसांपासून अतिशय खराब अवस्थेत होता. त्यामुळे नागरिकांना मोठ्या प्रमाणात त्रास सहन करावा लागत होता. वारंवार पाठपुरावा करूनही रस्त्याच्या कामाला विलंब होत असल्याने चिखली ग्रामपंचायतीचे उपसरपंच गणेश फुलबांधे यांच्या नेतृत्वाखाली १७ मेपासून बेमुदत उपोषण सुरू करण्यात आले होते.



आज दुपारी उमरेडचे उपविभागीय अधिकारी विद्यासागर चव्हाण यांच्या उपस्थितीत प्रशासन आणि आंदोलनकर्त्यांमध्ये चर्चा पार पडली. यावेळी प्रशासनाकडून सकारात्मक आश्वासन देण्यात आल्यानंतर उपोषण मागे घेण्यात आले.

या बैठकीला गंगाधर रेवतकर, तहसीलदार संजय राठोड, गटविकास अधिकारी चेतन जाधव, ठाणेदार रवींद्र मस्कर, शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) नगरसेवक कैलासभाऊ कोम्मलीवार, युवासेना उपजिल्हाप्रमुख वैभव ठाकरे, उपविभाग प्रमुख समीर बल्की, प्रीतीताई दिडमुठे, साठगावच्या उपसरपंचांसह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

उपविभागीय अधिकारी चव्हाण यांनी विधान परिषद निवडणुकीची आचारसंहिता संपल्यानंतर चिखली-भिवापूर रस्त्याच्या डांबरीकरणाचे काम तातडीने सुरू करण्यात येईल, असे स्पष्ट केले. तसेच कामाच्या गुणवत्तेवर नियंत्रण ठेवण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाचे अभियंते आणि ग्रामपंचायत सदस्यांची संयुक्त समिती नियुक्त करण्यात येणार असल्याची माहिती त्यांनी दिली.दरम्यान, प्रशासनाच्या आश्वासनानंतर आंदोलन समाप्तीची अधिकृत घोषणा करण्यात आली.

# रोहा उन्हाळी क्रीडा प्रशिक्षण शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद; युवा खेळाडूंमध्ये वाढतोय क्रीडेचा उत्साह

दैनिक वादळ वार्ता
**रोहा । प्रतिनिधी**

क्रीडा व युवक सेवा संचालनालय, पुणे अंतर्गत रायगड जिल्हा क्रीडा कार्यालयाच्या वतीने रोहा-धाटाव येथील तालुका क्रीडा संकुल समितीमार्फत आयोजित करण्यात आलेल्या उन्हाळी क्रीडा प्रशिक्षण शिबिराला तालुक्यातील खेळाडू, विद्यार्थी आणि पालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. या शिबिरामुळे ग्रामीण भागातील युवकांमध्ये क्रीडाविषयी नवचैतन्य निर्माण झाले आहे.



रायगड जिल्हा क्रीडा अधिकारी प्रकाश वाघ तसेच रोहा तालुका क्रीडा अधिकारी अंकिता मयेकर यांच्या मार्गदर्शनाखाली हे प्रशिक्षण शिबिर सुरू असून, विविध क्रीडा प्रकारांचे प्रशिक्षण अनुभवी प्रशिक्षकांकडून दिले जात आहे. शिबिरामध्ये कबड्डी, व्हॉलिबॉल, बॅडमिंटन, कराटे, लाठी-काठी, उशू तसेच विविध मैदानी खेळांचा समावेश करण्यात आला आहे.सकाळ आणि सायंकाळ अशा दोन सत्रांमध्ये प्रशिक्षण घेतले जात असून मोठ्या संख्येने खेळाडू नियमित सहभाग नोंदवत आहेत. शारीरिक तंदुरुस्ती, मानसिक एकाग्रता, खेळातील तांत्रिक कौशल्य तसेच संघभावना विकसित करण्यावर विशेष भर दिला जात आहे. विद्यार्थ्यांना शिस्त, आत्मविश्वास आणि क्रीडा संस्कारांचे महत्त्वही प्रशिक्षणादरम्यान समजावून सांगितले जात आहे.या प्रशिक्षणासाठी तज्ञ प्रशिक्षक रविंद्र कान्हेकर, राकेश पाटील, राकेश म्हसकर, अमित दळवी, विशाल गोवर्धने, रंजित रेवाळे, सिद्धी रेवाळे, कुणाल मालुंजकर, अमित घरत, श्रीकांत कांबळे, रोहन शेवाळे आणि धृती लाड हे मार्गदर्शन करत आहेत. प्रशिक्षकांच्या मेहनतीमुळे विद्यार्थ्यांमध्ये खेळांविषयी विशेष आकर्षण निर्माण झाले असून अनेक खेळाडू भविष्यात जिल्हा व राज्यस्तरीय स्पर्धांमध्ये चमकण्याचे स्वप्न पाहत आहेत.

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार क्रीडा प्रशिक्षणाची संधी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने या शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. यामुळे अनेक होतकरू खेळाडूंना आपली प्रतिभा सिद्ध करण्यासाठी व्यासपीठ मिळत आहे.

तालुका क्रीडा संकुल समितीच्या वतीने शिबिरासाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या असून आगामी काळातही अशाच प्रकारचे क्रीडा उपक्रम राबविण्यात येणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली. या उपक्रमामुळे रोहा तालुक्यातील क्रीडा संस्कृती अधिक बळकट होत असल्याची भावना पालक आणि नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे.

# वाघोली परिसरातील स्पा सेंटरवर छापा पाच महिलांची सुटका, एकाला अटक

दैनिक वादळ वार्ता
**पुणे/वाघोली । प्रतिनिधी**

गुन्हे शाखेच्या मानव तस्करी प्रतिबंधक कक्षाने वाघोली परिसरातील एका स्पा सेंटरवर छापा टाकून देहव्यापाराचा पर्दाफाश केला. या कारवाईत पाच महिलांची सुटका करण्यात आली असून एका आरोपीला अटक करण्यात आली आहे .महावीर सुदाम ससाने (वय २९, रा. पेरणे फाटा) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे.



गुन्हे शाखेच्या मानव तस्करी व अनैतिक व्यापार प्रतिबंधक कक्षाला शुक्रवारी (दि. २२) गुप्त माहिती मिळाली होती की, वाघोली येथील बकोरी फाटा परिसरातील '९ सेन्सेस स्पा' या स्पा सेंटरमध्ये महिलांकडून देह व्यापार करून घेतला जात आहे. त्यानुसार पोलिस निरीक्षक छगन कापसे यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने बनावट ग्राहकाच्या मदतीने माहितीची खातरजमा केली. त्यानंतर स्पा सेंटरवर अचानक छापा टाकण्यात आला. या कारवाईत स्पा सेंटरमधून पाच पीडित महिलांची सुटका करण्यात आली. तसेच महावीर ससाणे याला अटक करण्यात आली असून अन्य एका आरोपीविरोधातही गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी वाघोली पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.ही कारवाई पोलिस आयुक्त अमितेश कुमार, सह आयुक्त संजय दराडे, गुन्हे शाखेच्या अपर पोलिस आयुक्त तेजस्विनी सातपुते, पोलिस उपायुक्त गौहर हसन, एसीपी विजय कुंभार यांच्या मार्गदर्शनाखाली अनैतिक मानवी वाहतूक व व्यापार प्रतिबंध कक्षाचे पोलिस निरीक्षक छगन कापसे, पोलिस अंमलदार भिवरकर, आंधळे, केदार, जाधव, रसाळ, कोंडे तसेच महिला पोलिस अंमलदार कंक आणि खेडेकर यांच्या पथकाने केली.

# पत्रकार औटी यांच्या परिवाराला महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाची सांत्वन भेट!

दैनिक वादळ वार्ता
**जुन्नर । प्रतिनिधी**

पुणे जिल्ह्यातील जुन्नर तालुक्यातील राजुरी येथील पत्रकार चंद्रकांत सुदाम औटी यांचे नुकतेच हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने दुःखद निधन झाले. त्यांच्या निधनामुळे पत्रकारिता क्षेत्रासह परिसरात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य संघटक संजय भोकरे व प्रदेश अध्यक्ष निलेश सोमाणी यांच्या सूचनेनुसार, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस तथा दैनिक समर्थ गांवकरीचे संपादक डॉ. विश्वासराव आरोटे, पश्चिम महाराष्ट्र संपर्कप्रमुख सुभाष डोके तसेच जुन्नर तालुका अध्यक्ष नयन डुंबरे यांनी आवटी यांच्या परिवाराची सांत्वन भेट घेतली.



यावेळी उपस्थित मान्यवरांनी पत्रकार औटी यांच्या कार्याचा गौरव करताना सांगितले की, त्यांनी आपल्या पत्रकारितेच्या माध्यमातून आणि सहकार चळवळीद्वारे सर्वसामान्य जनतेचे प्रश्न सोडवण्यासाठी सातत्याने काम केले. आपल्या प्रभावी लिखाणातून त्यांनी समाजातील अनेक प्रश्नांना वाचा फोडली आणि लोकहिताचे कार्य केले.

तसेच महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या वतीने औटी यांच्या कुटुंबाला आर्थिक मदत व किराणा साहित्य देऊन आधार देण्याचा प्रयत्न करण्यात आला.यावेळी डॉ. विश्वासराव आरोटे बोलताना म्हणाले की, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ आपल्या पत्रकार बांधवांच्या कुटुंबाच्या पाठीशी कायम उभा आहे. परिवारावर कोणतीही अडचण किंवा प्रश्न निर्माण झाल्यास पत्रकार संघ नेहमी मदतीसाठी तत्पर राहील.

या भेटीद्वारे पत्रकार बांधवांमधील एकोपा, सामाजिक बांधिलकी आणि पत्रकार कुटुंबाप्रती असलेली संवेदनशीलता पुन्हा एकदा अधोरेखित झाली.

# गुंजेवाहीतील हल्लेखोर वाघीण कॅमेऱ्यात कैद; चार बछड्यांसह घटनास्थळी वावर

## मृतांमध्ये दोन जुळ्या सख्ख्या बहिणींचा समावेश; अंत्यसंस्कारावेळी संपूर्ण गाव शोकसागरात

## चार महिलांचा बळी घेतल्यानंतर वन विभागाची मोठी कारवाई; संपूर्ण सिंदेवाही तालुक्यात दहशतीचे सावट

### रात्री उशिरापर्यंत अंत्यसंस्कार; गाव शोकसागरात

**चारही मृतदेहांचे शवविच्छेदन पूर्ण झाल्यानंतर रात्री उशिरापर्यंत गुंजेवाही येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी संपूर्ण गाव शोकसागरात बुडाले होते. घरातील कर्त्या महिला गेल्यामुळे अनेक कुटुंबांचा आधार हरपल्याची भावना ग्रामस्थ व्यक्त करीत होते. गावकऱ्यांनी संबंधित वाघीणीला तातडीने जेरबंद करण्याची मागणी केली असून वन विभागाने जंगल परिसरात गस्त वाढविली आहे. नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहनही प्रशासनाकडून करण्यात येत आहे.**

दैनिक वादळ वार्ता
**चंद्रपूर । प्रतिनिधी**

सिंदेवाही तालुक्यातील गुंजेवाही जंगल परिसरात चार महिलांचा बळी घेणारी हल्लेखोर वाघीण अखेर वन विभागाने लावलेल्या लाईव्ह कॅमेऱ्यात कैद झाली आहे. विशेष म्हणजे ही वाघीण चार बछड्यांसह घटनास्थळी फिरताना आढळून आली असून वन विभागाने याला अधिकृत दुजोरा दिला आहे. या घटनेनंतर संपूर्ण गुंजेवाहीसह सिंदेवाही तालुक्यात भीतीचे वातावरण अधिक गडद झाले आहे.ब्रह्मपुरी वनविभागांतर्गत सिंदेवाही वनपरिक्षेत्रातील कंपार्टमेंट क्रमांक १८३६ मध्ये शुक्रवारी सकाळी साडेसातच्या सुमारास ही भीषण घटना घडली होती. तेंदूपत्ता संकलनासाठी जंगलात गेलेल्या चार महिलांवर वाघिणीने हल्ला करून त्यांचा



बळी घेतला होता. घटनेनंतर वन विभागाने युद्धपातळीवर शोधमोहीम सुरू करत घटनास्थळी २० ट्रॅप कॅमेरे आणि ३ लाईव्ह कॅमेरे बसविले होते.वन अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार, रात्रीच्या सुमारास लाईव्ह कॅमेऱ्यात संबंधित हल्लेखोर वाघीण दिसून आली. तिच्यासोबत चार बछडेही असल्याचे स्पष्ट झाले आहे. सुरुवातीला हल्ला करणारा प्राणी वाघ आहे की वाघीण, याबाबत संभ्रम होता. मात्र आता ती वाघीण असल्याचे निष्पन्न झाले असून तिला जेरबंद करण्यासाठी वन विभागाने विशेष कारवाई सुरू केली आहे.दरम्यान, या घटनेमुळे गुंजेवाहीसह संपूर्ण सिंदेवाही तालुक्यात प्रचंड दहशत निर्माण झाली आहे. सध्या तेंदूपत्ता संकलनाचा हंगाम सुरू असला तरी कालच्या घटनेनंतर अनेक महिला आणि ग्रामस्थ जंगलात जाण्यास धजावत नसल्याची माहिती समोर येत आहे. त्यामुळे या भागातील तेंदूपत्ता हंगामावर मोठा परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

### दोन जुळ्या बहिणींचाही मृत्यू

**या हल्ल्यात मृत्यूमुखी पडलेल्या महिलांमध्ये कवडूबाई दादाजी मोहुर्ले (४५) आणि अनुबाई दादाजी मोहुर्ले (४६) या दोन सख्ख्या बहिणींचा समावेश आहे. विशेष म्हणजे त्या दोघी जुळ्या बहिणी होत्या आणि अविवाहित होत्या. तर सुनीता कौशिक मोहुर्ले (३३) ही देखील मोहुर्ले कुटुंबातीलच होती.मृतांमध्ये संगीता संतोष चौधरी (३६) हिचाही समावेश असून तिच्या पतीचे काही वर्षांपूर्वी निधन झाले आहे. तिला दोन लहान मुली असून तिच्या मृत्यूमुळे त्या मुली अक्षरशः पोरक्या झाल्या आहेत. या घटनेमुळे गावात हळहळ व्यक्त केली जात आहे.**

# पुणतांब्यातील ऐतिहासिक अहिल्यादेवी घाटाफ्ची ना.राम शिंदे यांच्याकडून पाहणी

## घाट संवर्धन व भाविक सुविधांसाठी सकारात्मक पावले उचलणार; दक्षिण काशीफ्च्या विकासाला गती देण्याचे संकेत

दैनिक वादळ वार्ता

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

दक्षिण काशी म्हणून ओळख असलेल्या राहाता तालुक्यातील श्रीक्षेत्र पुणतांबा येथील ऐतिहासिक आणि धार्मिक वारशाची राज्याचे माजी मंत्री तथा विधान परिषदेचे सभापती ना. राम शिंदे यांनी प्रत्यक्ष पाहणी केली. गोदावरी नदीकाठी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी उभारलेल्या ऐतिहासिक ङ्गअहिल्यादेवी घाटाफ्ची पाहणी करताना त्यांनी घाटाच्या संवर्धनासह भाविकांसाठी आवश्यक सुविधा निर्माण करण्याबाबत सकारात्मक भूमिका व्यक्त केली. यावेळी त्यांनी प्राचीन कार्तिकस्वामी मंदिरात दर्शन घेत परिसरातील धार्मिक व आध्यात्मिक वातावरणाचा अनुभव घेतला. गोदावरी तीरावर उभा असलेला अहिल्यादेवी घाट हा केवळ ऐतिहासिक वास्तू नसून पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या लोककल्याणकारी, धर्मसंवर्धन आणि जनसेवेच्या






दूरदृष्टीची साक्ष देणारा प्रेरणादायी वारसा असल्याचे ना. शिंदे यांनी सांगितले.पुणतांबा हे धार्मिक, सांस्कृतिक आणि ऐतिहासिक महत्त्व लाभलेले क्षेत्र असून येथे वर्षभर भाविकांची मोठ्या प्रमाणावर वर्दळ असते. मात्र, वाढत्या भाविकसंख्येच्या तुलनेत परिसरात अधिक सुविधा व सुशोभीकरणाची आवश्यकता असल्याची भावना स्थानिक नागरिकांनी यावेळी व्यक्त केली. घाट परिसरातील स्वच्छता, प्रकाशयोजना, सुरक्षितता, सुशोभीकरण, पर्यटनवृद्धी तसेच भाविकांसाठी मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी व्यापक नियोजनाची गरज असल्याचेही यावेळी अधोरेखित करण्यात आले.अहिल्यादेवी घाट आणि कार्तिकस्वामी मंदिर परिसराचा ऐतिहासिक व धार्मिक वारसा जपत त्याचे संवर्धन करण्यासाठी शासनस्तरावर निश्चितच सकारात्मक पावले उचलली जातील. या पवित्र स्थळाला त्याच्या वैभवाला साजेशी ओळख मिळावी तसेच भविष्यात अधिकाधिक भाविक व पर्यटक येथे आकर्षित व्हावेत, यासाठी प्रयत्नशील राहणार असल्याचे ना. राम शिंदे यांनी स्पष्ट केले.यावेळी कोपरगावच्या माजी आमदार सौ. स्नेहलता कोल्हे,गंगाधर चौधरी, मधुकर सातव, सुभाषराव वहाडणे, भारतराव वहाडणे, सुधाकर जाधव, चंद्रकांत वाटेकर, अनिल नळे, संभाजी गमे, अशोकभाऊ पवार यांच्यासह पदाधिकारी, सहकारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# करमाळा मतदार संघासाठी चार ठिकाणी नवीन उपवीजकेंद्र उभारण्यात येणार तर चार ठिकाणी क्षमतावाढ करणार-आ.नारायण आबा पाटील

दैनिक वादळ वार्ता

**सोलापूर । प्रतिनिधी**

करमाळा मतदार संघातील वीजपुरवठा अधिक बळकट करण्यासाठी करमाळा तालूक्यात ३३/११ केव्हीए क्षमतेचे चार नवीन सबस्टेशन उभारण्यात येणार आहेत तर चार जुन्या सबस्टेशनची क्षमता वाढ करण्यात येणार असल्याची माहिती आमदार नारायण आबा पाटील यांनी दिली. याबाबत अधिक सविस्तर बोलताना आमदार पाटील म्हणाले की करमाळा मतदार संघातील निमगाव, सौंदे, वडशिवणे आणि ढोकरी या ठिकाणी ३३/११ केव्हीए क्षमतेच्या नवीन सबस्टेशनची उभारणी करण्यात येणार आहे. तर जातेगाव व आवाटी या करमाळा तालुक्यातील जुन्या सबस्टेशनमध्ये तसेच माढा तालुक्यातील कुर्डू व बारलोणी या सबस्टेशनमध्ये पाच एम व्ही ए क्षमतेचे नवीन



ट्रान्सफार्मर बसवून तेथील क्षमतावाढ करण्यात येणार आहे. यापैकी निमगाव (टे), सौंदे व वडशिवणे येथीन नवीन सबस्टेशनची उभारणी ही एडीबी योजनेतुन करण्यात येणार आहे. तसेच ढोकरी येथील सबस्टेशनची उभारणी ही आर डी एस एस या योजनेतुन करण्यात येईल. मंजुर असलेले चार अतिरिक्त पाच एमव्हीए क्षमतेचे नवीन ट्रान्सफार्मर हे सुद्धा एबीडी योजनेतुन बसविण्यात येणार आहेत. ३३/११ केव्हीए क्षमतेच्या नवीन मंजूर सबस्टेशन पैकी ढोकरी व वडशिवणे या ठिकाणी जागा उपलब्ध करुन देण्यासाठी आपले प्रयत्न सुरु आहेत. नवीन जागा हवी असल्याबाबत महावितरण कडूनही जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली आहे. यामुळे ही सर्व कामे मार्गी लावण्यासाठी आपला पाठपुरावा चालू असुन करमाळा मतदार संघातील नव्याने ओलीताखाली आलेले क्षेत्र लक्षात घेतल्यास वीज मागणी व प्रत्यक्षातील विज पुरवठा यातील फरक भरुन काढून शेतकऱ्यांना पुर्ण दाबाने व अखंडीत वीज पुरवठा मिळवून देण्यासाठी आपण कटिबद्ध असल्याचे आमदार नारायण आबा पाटील यांनी सांगितले.

# चिंचगावच्या श्री महादेव मंदिर विकासा साठी तब्बल २.४९ कोटींचा निधी मंजूर

## माजी आ.संजयमामा शिंदे यांच्या प्रयत्नांना यश; ग्रामीण यात्रास्थळाच्या विकासाला मिळणार गती

दैनिक वादळ वार्ता

**सोलापूर । प्रतिनिधी**

माढा तालुक्यातील चिंचगाव येथील प्रसिद्ध श्री महादेव मंदिर ग्रामीण यात्रास्थळाच्या विकासासाठी राज्य शासनाने तब्बल २ कोटी ४९ लाख ९९ हजार ४०३ रुपयांच्या निधीस प्रशासकीय मान्यता दिली आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर ग्रामीण यात्रास्थळ योजना (ब वर्ग) अंतर्गत हा निधी मंजूर करण्यात आला असून, माजी आमदार संजयमामा शिंदे यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे या विकासकामांना मंजुरी मिळाल्याचे सांगण्यात येत आहे.मा. प्रधान सचिव (ग्रामविकास) यांच्या अध्यक्षतेखाली ३१ ऑक्टोबर २०२५ रोजी झालेल्या राज्य निकष समितीच्या



बैठकीत संबंधित प्रस्तावावर सविस्तर चर्चा करण्यात आली होती. विकास कामांची अंदाजपत्रके, तांत्रिक बाबी तसेच आवश्यक कागदपत्रांची तपासणी केल्यानंतर समितीने निधीस मान्यता देण्याची शिफारस केली होती. त्यानुसार शासनाने सन २०२६-२७ च्या अर्थसंकल्पीय निधीतून या कामांना अधिकृत मंजुरी दिली आहे. मंजूर विकासकामांमध्ये एनएच-१४५ ते सत्संग आश्रम महादेव टेकडी, चिंचगाव रोडपर्यंत रस्ता सुधारणा करण्यासाठी ९९ लाख ९९ हजार ४२७ रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. तसेच सत्संग आश्रम परिसरात कॉंक्रिट व डांबरीकरणाच्या कामांसाठी ९९ लाख ९९ हजार ९७६ रुपये तर संरक्षण भिंत उभारण्यासाठी ५० लाख रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे.या विकासकामांमुळे यात्रेकरूंना अधिक चांगल्या सुविधा उपलब्ध होणार असून मंदिर परिसराचे सुशोभीकरण, सुरक्षितता आणि वाहतूक व्यवस्था अधिक सक्षम होण्यास मदत होणार आहे. विशेषतः धार्मिक पर्यटनाला चालना मिळून स्थानिक नागरिकांनाही याचा आर्थिक व सामाजिक लाभ होणार असल्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

ग्रामीण भागातील धार्मिक स्थळांच्या विकासासाठी शासनाने घेतलेल्या या निर्णयाचे चिंचगाव परिसरातील नागरिकांनी स्वागत केले आहे. श्री महादेव मंदिर परिसराचा सर्वांगीण विकास झाल्यास भविष्यात हे ठिकाण एक महत्त्वाचे धार्मिक व पर्यटन केंद्र म्हणून विकसित होईल, असा विश्वास ग्रामस्थांनी व्यक्त केला आहे.

# बकरी ईदच्या पार्श्वभूमीवर शांतता समितीची बैठक संपन्न

दैनिक वादळ वार्ता

**परभणी । प्रतिनिधी**

बकरी ईद सणाच्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात आज शांतता समितीची बैठक संपन्न झाली. नागरिकांनी धार्मिक सलोखा, शांतता आणि एकात्मतेची भावना जपत बकरी ईद उत्साहात साजरी करावी, असे आवाहन जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण यांनी केले. बैठकीस पोलीस अधीक्षक पंकज कुमावत, निवासी उपजिल्हाधिकारी अनुराधा ढालकरी, विविध विभागांचे अधिकारी-कर्मचारी तसेच शांतता समितीचे अध्यक्ष व सदस्य उपस्थित होते.

बकरी ईदच्या शुभेच्छा देऊन जिल्हाधिकारी श्री. चव्हाण म्हणाले की, सणांच्या काळात कोणाच्याही धार्मिक भावना दुखावल्या जाणार नाहीत याची सर्वांनी दक्षता घ्यावी. बकरी ईदनिमित्त जनावरांची कुर्बानी दिली जाते. मात्र, जनावरांची अवैध वाहतूक करणाऱ्यांवर संबंधितांनी कारवाई करावी. कचरा रस्त्यावर पडणार नाही तसेच त्याची योग्य विल्हेवाट लावण्यासाठी महानगरपालिका प्रशासनाने विशेष लक्ष द्यावे. सणांच्या काळात स्वच्छता राखणे ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी असल्याचेही त्यांनी सांगितले.महाराष्ट्रामध्ये गोवंश हत्या प्रतिबंधक कायदा लागू असून कोणीही गोवंश हत्या करू नये. तसे आढळून आल्यास कारवाई करण्यात येईल. शहरी तसेच ग्रामीण भागात शांतता अबाधित राहावी यासाठी आवश्यक बंदोबस्त ठेवण्याच्या सूचना देण्यात आल्या. सोशल मीडियावर वादग्रस्त संदेश किंवा व्हिडिओ प्रसारित करून वातावरण बिघडविणाऱ्यांवर तात्काळ कारवाई करण्यात येईल, असे जिल्हाधिकाऱ्यांनी स्पष्ट केले.पोलीस अधीक्षक श्री. पंकज कुमावत म्हणाले की, बकरी ईद शांततेत आणि उत्साहात साजरी व्हावी यासाठी पोलीस प्रशासन सतर्क आहे. ईदनिमित्त नमाजासाठी मोठ्या संख्येने नागरिक ईदगाह मैदानावर येत असल्याने आवश्यक सुरक्षा व्यवस्था करण्यात येणार आहे. समाजांमध्ये तेढ निर्माण होईल, असे संदेश किंवा व्हिडिओ कोणत्याही समाज माध्यमांवर प्रसारित करू नयेत, असे आवाहन त्यांनी केले.जिल्ह्यात कोणतीही अप्रिय घटना घडल्यास नागरिकांनी तात्काळ ११२ या क्रमांकावर पोलीस यंत्रणेशी संपर्क साधावा. सोशल मीडियावर पोलीस प्रशासनाचे विशेष लक्ष असून कायदा व सुव्यवस्थेला बाधा आणणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात येईल. कोणीही कायदा हातात घेऊ नये, संविधानाने दिलेल्या अधिकारांचा योग्य वापर करावा तसेच परवानगी असलेल्या जनावरांचेच बलिदान द्यावे, अशा सूचनाही त्यांनी दिल्या. गंभीर स्वरूपाच्या गुन्ह्यांमध्ये मकोका अंतर्गत कारवाई करण्याचा इशाराही यावेळी देण्यात आला. बकरी ईद सण सुरळीत आणि उत्साहात साजरा व्हावा यासाठी महानगरपालिकेने आवश्यक नियोजन करावे, अशा सूचनाही बैठकीत देण्यात आल्या.

# बैलजोडीवर भारी पडतेय आता ट्रॅक्टरची हॉर्सपॉवर

दैनिक वादळ वार्ता

**किनवट । प्रतिनिधी**

हवामानातील बदल, मजुरांची समस्या आणि त्यातच वाढलेली मजुरी या सर्व बाबीचा परिणाम शेतीवर होऊ लागला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचा पारंपरिक शेतीऐवजी यांत्रिकीकरणाकडे कल वाढला आहे. नांगरणीसाठी वर्षभर बैलजोडी सांभाळण्याचा खर्च परवडत नाही. त्यामुळे शेतकरी ट्रॅक्टरचा वापर करू लागले आहेत. आता बैलजोडीपेक्षा ट्रॅक्टर परवडत आहे, असे काही शेतकऱ्यांचे म्हणणे आहे.

खरीप हंगाम काही दिवसांवर येवून ठेपला आहे. त्यामुळे पेरणीपूर्व मशागतीची कामे सर्वत्र सुरू आहेत. शेत शिवारात नांगरणीसाठी ट्रॅक्टरऐवजी पॉवर टिलरचा वापर केला जात आहे. यांत्रिक अवजारे खरेदीसाठी शासकीय अनुदान तसेच जीएसटीवर कपात उपलब्ध



असल्यामुळे ट्रॅक्टर किंवा पॉवर टिलर खरेदीकडे शेतकऱ्यांचा कल अधिक वाढला आहे. स्वतःच्या शेतीची नांगरणी केल्यानंतर इतर शेतकऱ्यांना पॉवर टिलर भाड्याने उपलब्ध करून दिला जातो आहे. तासावर भाडे आकारले जात असल्यामुळे शेतकऱ्यांचा दुहेरी फायदा होत आहे. बैलजोडीच्या तुलनेत पॉवर टिलर किंवा ट्रॅक्टरचा देखभाल, दुरुस्ती खर्च कमी असल्यामुळे शेतकऱ्यांना याचा फायदा होत आहे. कृषी विभागाकडूनही शेतकऱ्यांना

यांत्रिक अवजारे खरेदी करण्यासाठी प्रोत्साहन देण्यात येत आहे.

ट्रॅक्टर किंवा पॉवर टिलर वापरामुळे शेतीची कामे वेळेत व अचूक होतात. मजुरांची समस्या, बैलजोडीचा खर्च परवडत नाही. शिवाय विविध यांत्रिक अवजारांच्या खरेदीसाठी शासनाकडून अनुदान उपलब्ध होत असल्यामुळे खरेदी करणे सुलभ झाली आहे.

मजुरांची टंचाई, बैलजोडीचा खर्च परवडेना ग्रामीण भागात शेतीच्या कामासाठी मजुरांची टंचाई भासत आहे. शिवाय वर्षभर बैलजोडी सांभाळण्याचा खर्चही परवडत नाही. कमी वेळेत, अचूक पद्धतीने शेतीची कामे करण्यासाठी यांत्रिक अवजारांचा वापर सध्या वाढला आहे. यांत्रिकीकरणामुळे वेळ, श्रम, पैशांची बचत होऊ लागली आहे.

# गडचांदूरमध्ये शेतकरी संघटनेकडून हंगामी प्रवासी निवारा; प्रवाशांना शरबत वाटप

दैनिक वादळ वार्ता

**कोरपना । प्रतिनिधी**

राजुरा-कोरपना राज्य महामार्गाच्या सुरू असलेल्या कामामुळे बस थांब्याजवळ मोठी अडचण निर्माण झाली असून कडक उन्हाळ्यात प्रवाशांना तासनतास उन्हात उभे राहून बसची प्रतीक्षा करावी लागत आहे. सावलीची कोणतीही व्यवस्था नसल्याने प्रवाशांची मोठी गैरसोय होत होती. ही समस्या लक्षात घेऊन शेतकरी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी पुढाकार घेत प्रवाशांसाठी हंगामी निवाऱ्याची व्यवस्था उभारली.




माजी ग्रामपंचायत सदस्य तथा शेतकरी संघटनेचे सरचिटणीस संतोष पटकोटवार यांनी होमिओपॅथी तज्ञ डॉ. के. आर. भोयर यांची भेट घेऊन प्रवाशांच्या समस्येबाबत चर्चा केली. यावेळी डॉ. भोयर यांनी तत्काळ जागा उपलब्ध करून देत सामाजिक बांधिलकी जपली. त्यानंतर संतोष पटकोटवार यांनी स्वखर्चातून हंगामी प्रवासी निवारा उभारून प्रवाशांसाठी पिण्याच्या पाण्याची तसेच शरबताची व्यवस्था केली.

या हंगामी प्रवासी निवाऱ्याचे उद्घाटन डॉ. के. आर. भोयर यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाला जि.प. शाळेचे माजी मुख्याध्यापक वासुदेव गौरकार, भास्कर चटप, मनोहर सातपुते, शंकर पटकोटवार, ज्ञानेश्वर अवताडे, आकाश ठमके, किशोर वैद्य, संजय नरड, किशोर गोरे यांच्यासह अनेक प्रवासी उपस्थित होते.उपस्थित प्रवाशांनी शेतकरी संघटनेच्या या सामाजिक उपक्रमाचे कौतुक करत पदाधिकाऱ्यांचे आभार मानले. कडक उन्हाळ्यात प्रवाशांना दिलासा देणारा हा उपक्रम सध्या परिसरात चर्चेचा विषय ठरत आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077